# आयुष्मान भारत योजना

'सर्वांसाठी आरोग्य' या दृष्टिकोनातून 'आयुष्यमान भारत' या अभियानअंतर्गत **'प्रधानमंत्री जन आरोग्य योजना'** २३ सप्टेंबर, २०१८ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या द्वारे देशभरात लागू करण्यात आली. 'प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' ही एक आरोग्य योजना आहे, जिचा उद्देश प्रत्येक कुटुबांला प्रतिवर्ष ५ लाख रुपये पर्यंतची आरोग्य सेवा पुरवली जाते.

## आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना वैशिष्ट्ये:

आयुष्यमान भारत अभिअयानअंतर्गत प्रधानमंत्री योजनेची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

• प्रधानमंत्री जन आरोग्य योजना पूर्णतः भारत सरकारद्वारे आरोग्य आर्थिक सहाय्य देणारी जगातील सर्वात मोठी आरोग्य हमी योजना आहे.

• ही योजना भारतातील सार्वजनिक आणि खाजगी सूचीबद्ध रुग्णालयात दुय्यम आणि तृतीयक आरोग्य उपचारांसाठी प्रति कुटुंब, प्रति वर्ष ५ लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते.

• प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी ३ दिवस अगोदर आणि १५ दिवसांच्या वैद्यकीय उपचारानंतर, आरोग्य उपचार आणि औषधे मोफत उपलब्ध दिली जातात.

• या योजनेअंतर्गत कुटुंबाचा आकार, वय किंवा लिंग यावर कोणतीही मर्यादा नाही.

• प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत पहिल्या दिवसापासून अगोदरपासूनच अस्तित्वात असलेल्या वैद्यकीय परिस्थिती आणि गंभीर आजारांचा समावेश केला जातो.

• प्रधानमंत्री जन आरोग्य ही एक पोर्टेबल योजना आहे म्हणजेच, लाभार्थी देशभरातील कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी सूचिबद्ध रुग्णालयात याचा लाभ घेऊ शकतात.

• योजनेमध्ये सुमारे 1,393 प्रक्रिया आणि पॅकेजेस समाविष्ट आहेत जसे की औषधे, पुरवठा, निदान सेवा, डॉक्टर्स फी, रूम फी, O-T आणि I-C-U फी इत्यादी जे मोफत उपलब्ध आहेत.

• खाजगी रुग्णालयांना, सार्वजनिक रुग्णालयांच्या बरोबरीने आरोग्य सेवांसाठी प्रतिपूर्ति (Reimbursement) केली जाते.

## आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लाभ:

केंद्र सरकारमार्फत देशभरात राज्य स्तरांवर विविध आरोग्य विमा योजना राबविल्या जातात, ज्यामध्ये प्रति कुटुंब ३०,००० ते ३,००,००० रुपयांपर्यंत आरोग्य सेवा/कव्हरेज दिले जाते. मात्र, आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत रुपये ५,००,००० पर्यंत आरोगय सेवा देणारी एकमेव योजना आहे. या योजनेमध्ये खालील उपचार सेवा मोफत केले जातात.

- वैद्यकीय तपासणी, उपचार
- रुग्णालयात दाखल होण्यापूर्वीचा खर्च
- औषधे आणि वैद्यकीय वस्तू
- क्लिनिकल आणि प्रयोगशाळा चाचण्या
- वैद्यकीय आरोपण सेवा (जेथे आवश्यक असेल)
- रुग्णालयात मुक्काम
- रुग्णालयात अन्न खर्च
- उपचारादरम्यान उद्भवणारी गुंतागुंत
- रुग्णालयात दाखल केल्यानंतर 15 दिवसांपर्यंत आरोग्य सेवा.

आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत, ५,००,००० रुपयांचा लाभ संपूर्ण कुटुंबासाठी उपलब्ध आहे, म्हणजेच तो कुटुंबातील एक किंवा सर्व सदस्य वापरू शकतात. आरएसबीवाय RSBY योजनेंतर्गत कुटुंबात पाच सदस्यांची मर्यादा होती. त्या योजनेमधील त्रुटी लक्षात घेऊन, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेची रचना अशा प्रकारे करण्यात आली आहे की, योनजेचा लाभ मिळविण्यासाठी कुटुंबाच्या आकारावर किंवा सदस्यांच्या वयावर मर्यादा नाही. याशिवाय, या योजनेत पहिल्या दिवसापासून विविध आजारांचा समावेश करण्यात आला आहे. याचा अर्थ असा की प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये नावनोंदणी करण्यापूर्वी कोणत्याही प्रकारचा रोग किंवा आरोग्य स्थिती ग्रस्त असलेल्या व्यक्तीला पहिल्या दिवसांपासून सर्व वैद्यकीय उपचार दिले जातात.

## आयुष्मान भारत योजना पात्रता:

आयुष्मान भारत योजनेतील लाभार्थ्यांची निवड सामाजिक-आर्थिक जात गणना (एसईसीसी -2011 - SECC 2011) च्या आधारे या योजनेतर्गत लाभार्थ्यांची निवड केली जाते. आयुष्मान भारत योजनेची माहिती देण्यासाठी केंद्र सरकारने पंतप्रधान जन आरोग्य योजना ऑनलाईन वेबसाइट सुरू केली आहे. या संकेतस्थळावर आयुष्मान भारत लाभार्थी यादी आपण तपासू शकता.

याशिवाय, जी कुटुंबे आधीपासून राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना (RSBY) चे लाभार्थी होती परंतु SECC 2011 चा भाग नाही त्यांचाही आयुष्मान भारत योजना या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

SECC मध्ये सामाजिक-आर्थिक स्थितीच्या आधारावर कुटुंबांची क्रमवारीनुसार प्राधान्य दिले जाते. ग्रामीण भागातील कुटुंबे जी समाविष्ट आहेत त्यांना खालीलप्रमाणे निकषांच्या आधारावर क्रमवारी दिली जाते. शहरी कुटुंबांचे वर्गीकरण व्यवसायाच्या श्रेणीनुसार केले जाते.

### आयुष्मान भारत योजना - ग्रामीण लाभार्थी:

आयुष्मान भारत योजना - प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ मिळविण्यासाठी SECC 2011 डेटाबेस मध्ये सामाविष्ट असलेले ग्रामीण लाभार्थींना खालील निकषांच्या आधारे प्राधान्यक्रम दिले जाते.

१. ज्या कुटुंबाचे घर फक्त एक खोली ज्यात कच्ची भिंती आणि छत आहे.

२. ज्या कुटूंबात १६ ते ५९ वयोगटातील कोणताही प्रौढ सदस्य नाही.

३. अक्षम सदस्य आणि सक्षम शरीर नसलेला प्रौढ सदस्य.

४. SC/ST घरे

५. भूमिहीन कुटुंबे ज्यांना त्यांच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा अंगमेहनतीतून मिळतो.

### आयुष्मान भारत योजना - शहरी लाभार्थी:

आयुष्मान भारत योजना - प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ मिळविण्यासाठी SECC 2011 डेटाबेस मध्ये सामाविष्ट असलेले शहरी लाभार्थींना खालील निकषांच्या आधारे प्राधान्यक्रम दिले जाते.

शहरी भागांसाठी, खालील 11 व्यावसायिक श्रेणीतील कामगार या योजनेसाठी पात्र आहेत:

१. कचरा उचलणारे

२. भीक मागून उदर निर्वाह करणारे

३. घरगुती कामगार

४. रस्त्यावरील विक्रेते / चर्मकार / फेरीवाले इत्यादी

५. बांधकाम कामगार / प्लंबर / मजदूर / पेंटर / वेल्डर / सुरक्षा रक्षक / कुली आणि इतर हेड लोडर

६. सफाई कामगार / सफाई कर्मचारी / माळी

७. वाहतूक कर्मचारी/वाहन चालक/वाहक/चालक/वाहक सहाय्यक/गाडी ओढणारा/रिक्षाचालक

८. दुकानातील कामगार / सहाय्यक / छोट्या संस्थांमधील शिपाय / मदतनीस /

९. परिचर / वेटर, इलेक्ट्रिशियन / मेकॅनिक / असेंबलर / दुरुस्ती कामगार

१०. धोबी / पहारेकरी

आयुष्मान भारत योजना - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना कुटुंबांच्या पात्रतेचा आधार म्हणून SECC चा वापर करत असले तरी, अनेक राज्ये आधीच ओळखल्या गेलेल्या लाभार्थ्यांच्या यादीसह त्यांच्या स्वत:च्या आरोग्य विमा योजना राबवत आहेत. अशा प्रकारे, राज्यांना आयुष्मान भारत योजना - प्रधान मंत्री जन आरोग्य योजनासाठी त्यांचा स्वतःचा डेटाबेस वापरण्याची स्वायत्तता देण्यात आली आहे. तथापि, या राज्यांनी SECC डेटाबेसवर आधारित सर्व कुटुंबांचा समावेश सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

## आयुष्मान भारत योजना महाराष्ट्र:

केंद्र शासनाने आयुष्यमान भारत कार्यक्रम देशभरात सुरु केला होता. या अभियानअंतर्गत, दिनांक, २३ सप्टेंबर, २०१८ पासून महाराष्ट्र राज्यामध्ये राबिविण्यास सुरुवात झाली. त्याचबरोबर, केंद्र शासनाची प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि राज्य शासनाची महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना स्वतंत्रपणे राबविल्या जात आहेत.

केंद्र शासनाने प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत १३४९ उपचार निश्चित केले आहेत. तर, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये ९७१ उपचार समाविष्ट आहेत. दोन्ही योजनेमधील २३२० उपचारांचा आढावा घेऊन १६३२ उपचारांची एकत्रित यादी तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये, ५८१ उपचार दोन्ही योजनेमध्ये समाविष्ट आहेत. तर प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील ६६१ उपचारांचा महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत समावेश नाही.

## आयुष्मान भारत योजना रजिस्ट्रेशन ऑनलाइन:

आयुष्मान भारत अभियानाअंतर्गत प्रधानमंत्री जनआरोगय योजनेचा लाभ मिळविण्यासाठी खालीलप्रमाणे नोंदणी करता येऊ शकते.

१. सर्वप्रथम प्रधानमंत्री आयुष्मान भारत योजनेच्या अधिकृत संकेतस्थळावर www.pmjay.gov.in वर भेट द्या.

२. त्यानंतर होमपेजवर 'AM I Eligible' हा पर्याय निवडा.

३. यानंतर, तुमचा मोबाईल क्रमांक टाकून 'OTP' पडताळणी करा.

४. नवीन पेज उघडेल त्यात, पात्रता तपासण्यासाठी तुमचे राज्य निवडा.

५. त्यानंतर, पात्रता तपासण्यासाठी नाव, रेशन कार्ड आणि मोबाईल क्रमांक यापैकी पर्याय निवडून सबमिट बटनवर क्लिक करा.

## आयुष्मान भारत योजना ऑफलाईन अर्ज:

१. प्रधानमंत्री आयुष्मान भारत योजनेअंतर्गत अर्ज करण्यासाठी (Ayushman Bharat Registration), प्रथम कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) वर आवश्यक कागदपत्रांसह भेट द्या आणि सर्व कागदपत्रांची छायाप्रत सबमिट करा.

२. यानंतर, कॉमन सर्विस सेंटर चे कर्मचारी एजंट सर्व कागदपत्रांची पडताळणी करून, तुमच्या वतीने योजनेची नोंदणी करतील.

आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जण आरोग्य योजना आवश्यक कागदपत्रे - आधार कार्ड, रेशनकार्ड, पॅनकार्ड कार्ड, फोटो व मोबाईल क्रमांक.

३. त्यानंतर, १० ते १५ दिवसांनी तुम्हाला CSC केंद्राकडून आयुष्मान भारतचे गोल्डन कार्ड (Ayshuman card) दिले जाईल. अशा प्रकारे तुमची नोंदणी योजनेसाठी यशस्वी होईल.

**टीप**: आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ मिळविण्यासाठी आयुष्मान कार्ड असणे आवश्यक आहे.

## आयुष्मान भारत योजना हॉस्पिटल लिस्ट:

आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत सूचिबद्ध हास्पिटलांची यादी पाहण्यासाठी, https://hospitals.pmjay.gov.in/Search/empnlWorkFlow.htm?actionFlag=ViewRegisteredHosptlsNew या योजेनच्या अधिकृत लिंकवर भेट द्या.

वरील लिंकला भेट दिल्यावर राज्य, जिल्हा, हॉस्पिटल प्रकार, वैशिष्ट्य, हॉस्पिटल नाव ( State, District, Hospital Type, Speciality, Hospitals Name) इत्यादी पर्यायांची निवड करून, कॅप्टचा टाका. त्यानंतर, तुम्हाला हॉस्पिटलचा ई-मेल, फोन नंबर आणि त्या हॉस्पिटलमध्ये तुम्हाला कोणत्या सुविधा दिल्या जातील याची माहिती तुम्हाला मिळेल.

## आयुष्मान भारत योजना हेल्पलाइन नंबर:

सदर लेखमध्ये आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसंबंधित संपूर्ण माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे तरीही, तुम्हाला कोणत्याही प्रकारची समस्या येत असेल तर तुम्ही टोल फ्री क्रमांकावर संपर्क करून तुमची समस्या सोडवू शकता. **14555/1800111565** हा टोल फ्री क्रमांक आहे.

आशा स्वयंसेविका

आशा स्वयंसेविका केंद्र शासनाने दिनांक १२ एप्रिल, २००५ रोजी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान Maharashtra (NRHM) राज्य पातळीवर राबविण्यास सुरवात केली. या अभियानाअंतर्गत विशेषतः ग्रामीण पातळीवर आरोग्या संदर्भात जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने आशा स्वयंसेविका Accredited Social Health Activist म्हणून गावातील स्थानिक महिलांची नेमणूक केली. आशा स्वयंसेविकां महत्वपूर्ण आरोग्य सामाजिक दुवा म्हणून राज्यात कार्य पार पाडत असतात. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातील The National Rural Health Mission शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहचविण्याची कामगिरी आशा स्वयंसेविका बजावत असतात. या लेखात आशा स्वयंसेविका विषयी माहिती, आशा स्वयंसेविका मानधन, आशा स्वयंसेविका नियुक्ती प्रक्रिया, आशा कार्यकर्ता लिस्ट इत्यादी बाबत माहिती तुम्हाला वाचायला मिळेल.

आशा ASHA ची ठळक वैशिष्टये

• प्रत्येक गाव-खेड्यात सामाजिक कार्यकर्ता म्हणुन आरोग्य सुविधा देण्यासाठी आशा स्वयंसेविका कार्यरत असतात.

• आशा सेविकेची गावातील गावातील स्थानिक विवाहित महिलेची ग्रामसभेद्वारे निवड केली जाते.

• महाराष्ट्र राज्यात ७१ हजार आशा स्वयंसेविका कार्यरत आहेत आणि आरोग्यविषयक शासनाने नेमून दिलेल्या एकूण ७८ सेवा त्यांना लोकांना प्रदान कराव्या लागतात.

• ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची सदस्य सचिव अंगणवाडी सेविकेऐवजी आशा स्वयंसेविका असतात. (शासन निर्णय - साआवि- २०१७/प्र. क ३३७/आ-७).

• आशा स्वयंसेविकेच्या कार्यप्रणालीस गती येण्यासाठी तसेच त्यांच्या कामाचे मोजमाप व व्यवथापन करण्याकरिता जिल्हा पातळीवर १ जिल्हा समूह संघटक व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर एका गट प्रवर्तकांची नेमणूक करण्यात आलेली असते.

आशा स्वयंसेविका नियुक्ती प्रक्रिया |

• आशा स्वयंसेविका किमान १० वी पास असावी.

• वयोमर्यादा २५ ते ४५ वर्षे व विवाहीत महिला असावी. विधवा/घटस्फोटीत/ परितक्त्या यांना प्राधान्य देण्यात येते.

• आशाची निवड ग्रामसभेमार्फत केली जाते.

• ग्रामसभेने निवडलेल्या आशाची नियुक्ती तालुका आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येते.

• गावातील १५०० लोकसंख्येमागे एका आशे ची निवड केली जाते व त्यापुढील प्रत्येकी १००० लोकसंख्येच्या प्रमाणात एका आशेची निवड करण्यात येते.

• आशाच्या नियुक्तीनंतर २३ दिवसांचे प्रशिक्षण ५ टप्प्यात दिले जाते.

• आशाने केलेल्या कामाच्या स्वरूपावर त्यांना मोबदला दिला जातो.

आशा स्वयंसेविका महत्वाची कर्तव्य, कामे व जबाबदाऱ्या / आशा वर्कर ची कामे

• आरोग्य बाबतीत लोकांमध्ये मानसिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणणे.

• आरोग्य सेवांचा लाभ घेण्यासाठी गावातील जनतेला प्रोत्साहीत करणे.

• गावातील आरोग्य संस्थेतील प्रसूतीमध्ये वाढ करणे.

• मलेरिया, क्षयरोग, साथीचे रोग उपचारासाठी मदत करणे.

• रुग्णास रुग्णालयात पोहचविण्यासाठी सहाय्य करणे.

• कुटुंब कल्याण प्रचार, सॅनिटरी पॅड, गर्भनिरोधकाचे वाटप मोफत/माफक दरात करणे.

• साध्या आजारावर उदा. ताप, खोकला यावर प्राथमिक वैद्यकीय सेवा पूरविणे व औषधोपचार करणे.

• प्रसूतीपूर्ण तपासणी, लसीकरण, स्तनपान, आहार इत्यादी बाबत माता व बाल आरोग्याविषयी प्रबोधन करणे.

• गावपातळीवर आरोग्य नियोजन करण्यात सहभागी होणे व अंगणवाडी कार्यकर्ती, आरोग्य सेविका/सेविका यांच्यासह विचारविनिमय करणे.

• प्रत्येक जन्माची व उपजत मृत्यूची नोंद ठेवणे, आपण केलेल्या कामाची रजिस्टरमध्ये नोंद करून ठेवणे इत्यादी आरोग्य विषयक महत्वपूर्ण नोंद ठेवणे.

अशा प्रकारच्या आरोग्यविषयक ७८ सेवा आशा स्वयंसेविका ग्रामीण पातळीवर शेवटच्या टप्प्या पर्यंत पुरवत असतात.

हे देखील वाचा : राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

आशा स्वयंसेविका प्रशिक्षण

आशा स्वयंसेविकेची नियुक्ती झाल्यानंतर त्यांना एकूण ५ टप्प्यात प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्या प्रशिक्षणाचा कालावधी २३ दिवस एवढा असतो. आशा स्वयंसेविकेला सात दिवसांचे मूलभूत प्रशिक्षण देण्यात येते व तिला सोबत प्रशिक्षण मार्गदर्शिका पुस्तिका देण्यात येते. याचबरोबर, आवश्यक असेल तेव्हा, वेळोवेळी मासिक सभा आयोजित करून तिला प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणाच्या वेळी तिला प्रवास भत्ता व दैनिक भत्ताही देण्यात येतो.

आरोग्य गट प्रवर्तक (Block Facilitator)

आशा स्वयंसेविकीची कार्य सुव्यवस्थिती पार पडावीत म्हणून त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन मिळावे व आशा ची समस्या गावपातळीवर सोडविल्या जाण्यासाठी, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात १ गट प्रवर्तक महिला (Block Facilitator) ची नियुक्ती केली आहे.

आरोग्य गट प्रवर्तकाच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या

आशा स्वयंसेविका व आरोग्य विभाग यांच्यामधील दुवा म्हणून गट प्रवर्तकाची भूमिका असते.

• आशा स्वयंसेविकांना येणाऱ्या अडचणी समजून घेणे व अडचणी सोडविणे. आशांना त्यांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव दणे.

• आशा स्वयंसेविकांना त्यांच्या कामाचा मोबदला वेळेवर मिळावा म्हणून पाठपुरावा करणे.

• आशा स्वयंसेविकेला देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण दरम्यान उपस्थित राहून प्रशिक्षणाची उजळणी घेणे.

• प्रत्येक आशा स्वयंसेविकेला गट प्रवर्तक महिलेने महिन्यातून दोन भेटी देणे गरजेचे आहे.

• आशा स्वयंसेविकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्र आणि तालुका सभेस उपस्थित राहणे व मार्गदर्शन करणे.

• आशा स्वयंसेविकेचा गावपातळीवर समन्वय साधण्यासाठी सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष यांना भेटून आशा स्वयंसेविकेच्या भूमीकेविषयी माहिती देणे.

आशा सेविका मोबदला / आशा वर्कर मानधन

आशा वर्कर सैलरी 2021 marathi आशा ही सरकारी कर्मचारी अथवा मानधनी कर्मचारी नसून तिला केलेल्या कामानुसार मोबदला देण्यात येतो.

देशातील आशा सेविकांना ४ ते १० हजारांचा मोबदला मिळतो मात्र, महाराष्ट्र राज्यात आशा सेविकांना रु.१५००/- दरमहा एवढा मोबदला मिळत होता. आशा सेवकांची जबाबदारी आणि महत्वाची भूमिका विचारात घेता महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक १७ जुलै, २०२० च्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांअंतर्गत कार्यरत आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांच्या मोबदल्यात वाढ करण्यात आली. या अभियानात आशा सेविकांना केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचना नुसार नेमून दिलेल्या ७८ सेवा केल्यास त्या सेवेस केंद्र शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे मोबदला दिला जातो.

आशा सेविकांना एकूण ७८ सेवांपैकी नियमित ४ कामांसाठी प्राप्त होणाऱ्या मोबदल्याच्या समप्रमाणात कमाल रु. २०००/- पर्यंत दरमहा तसेच, गटप्रवर्तकांना रु. ३०००/- दरमहा इतका राज्य शासनाच्या निधीतून वाढीव मोबदला देण्यास शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे.

केंद्र सरकारच्या ७८ सेवांपैकी आशा सेवकांची नियमित ४ कामे व दरमहा मोबदला पुढीलप्रमाणे:

१. आशाला नेमून दिलेल्या भागातील सर्व लाभार्थ्यांची यादी करणे, दिलेल्या सेवांची माहिती व अहवालाचे अचूक संकलन आणि वरिष्ठांना सादर करणे. - रु.१५००/-

२. ग्राम आरोग्य पोषण दिवस अंमलबजावणी - या दिवशी सेवा देण्यासाठी आवश्यक असणारे बालके, माता, कुटूंब कल्याण लाभार्थी इत्यादींना सेवा घेण्यासाठी प्रवृत्त करणे. - रु.२००/-

३. ग्राम आरोग्य, पोषण आणि स्वच्छता समितीची मासिक सभा समितीच्या सचिव या नात्याने बोलावणे, सभेचे इतिवृत्त तयार करणे, त्यास मान्यता घेणे आणि सभेतील निर्णयांच्या अंमलबाजावणीची समितीस माहिती देणे. - रु. १५०/-

४. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील मासिक बैठकीत हजर राहून महिन्यातील केलेल्या कामाचा आढावा देणे. - रु.१५०/-

राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या निर्धारती निकष दरानुसार इतर निर्धारित ७४ सेवां बाबतीत आशा सेविकांना दिल्या जाणाऱ्या मोबदल्यात वाढ करण्यात आली नाही.

आशा कार्यकर्ता लिस्ट । आशा स्वयंसेविका महाराष्ट्र ऑनलाईन यादी

आशा कार्यकर्ता लिस्ट महाराष्ट्र ऑनलाईन यादी पाहण्यासाठी, तसेच, गावातील ग्रामसेवक, आरोग्य सेविका आणि इतर कर्मचाऱ्यांची यादी पाहण्यासाठी खाली दिलेल्या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळाच्या लिंकवर जा.

आशा स्वयंसेविका महाराष्ट्र ऑनलाईन यादी

त्यानंतर महाराष्ट्र राज्य, जिल्हा, तालुका आणि गावाचं नाव निवडून गावातील शासकीय अधिकारी आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची यादी ऑनलाईन पाहता येईल.

वाचकमित्रहो, आशा स्वयंसेविका सोबतच आरोग्य सेविका, अंगणवाडी कार्यकर्ती यांचे मार्फत आरोग्य व पोषण सेवा गावपातळीवर देत असतात. सध्याच्या कोविड- १९ च्या लढाईत रात्रं-दिवस स्वतःला झोकून देऊन या कार्यकर्त्या जवाबदारी व कुशलतेने त्यांचे काम करीत असतात. त्यामुळे प्रत्येक गाव-खेड्यासाठी आशा आणि इतर आरोग्य सेविका एक आशेचा किरणच म्हणावा लागले.

## प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना मराठी

प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना मराठी भारत देशातील अनेक गर्भवती महिलांना (Pregnant Women) गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंतच्या काळात मजुरीसाठी काम करावे लागते. तसेच, प्रसूतीनंतर (After Delivery) शारिरिक क्षमता नसतानाही मजुरीसाठी तत्काळ काम करावे लागते. यामुळे अशा गर्भवती महिला व माता कुपोषित राहून त्यांचे व त्यांच्या नवजात बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. यामुळे देशाच्या मातामृत्यू, बालमृत्यू Maternal Mortality, Child Mortality Rate दरात वाढ होते.

माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी व जन्माला येणाऱ्या नवजात बालकांचेही आरोग्य सुधारावे व मातामृत्यू व बालमृत्यू दरात घट होऊन तो नियंत्रित रहावा यासाठी, केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालय विभागाने प्रधानमंत्री मातृ वंदना ही नवीन योजना संपूर्ण देशात दिनांक १२ जानेवारी, २०१७ पासून राबविण्यास मान्यता दिली. त्यानुसार, ८ डिसेंबर २०१७ पासून महाराष्ट्र राज्यात प्रधानमंत्री मातृवंदना योजना राबविण्याची अंमलबजावणी झाली.

मातामृत्यू व बालमृत्यू दर कमी करण्याच्या दृष्टीने संपूर्ण देशात आणि महाराष्ट्र राज्यातील अमरावती व भंडारा या दोन जिल्ह्यांमध्ये महिला व बालकल्याण विभागामार्फत राबवण्यात येत असलेली इंदिरा गांधी मातृत्व सहयोग ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना बंद करून, सदर योजनेचे अनुदान प्रधानमंत्री मातृ वंदना या केंद्रपुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीसाठी उपयोगात आणले.

सदर योजना केंद्र व राज्य शासन यांच्या सहभागाने राबविली जात असून, या योजनेत केंद्र शासनाचा ६० टक्के तर राज्य शासनाचा ४० टक्के सहभाग असतो.

### प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजनेची ठळक वैशिष्ट्ये:

केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचना निकष कार्यपद्धती व विकसित केलेल्या संगणक प्रणालीद्वारे आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्यामार्फत प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेची अंमलबजावणी केली जाते.

१) सदर योजना एक वेळा आर्थिक लाभाची असून पहिल्या जीवित अपत्य पुरतीच मर्यादित आहे व सदर लाभ एकदाच घेता येतो.

२) राज्यातील १ जानेवारी २०१७ किंवा त्यानंतर कुटुंबातील पहिल्या अपत्यासाठी गरोदर असण्याऱ्या सर्व गर्भवती महीला आणि स्तनदा माता या योजनेसाठी पात्र असतील.

३) नैसर्गिक गर्भपात झाल्यास किंवा मृत बालक जन्मलास त्या टप्प्यापुरातच एकदा लाभाची संधी राहील.

४) या योजनेत दारिद्रय रेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील लाभार्थ्यांचा समावेश असला तरी वेतनासह मातृत्व रजा मिळणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.

५) शासनाने अधिसूचित केलेल्या संस्थेत गर्भवती महिलांना नोंदणी करणे आवश्यक आहे.

६) लाभाची रक्कम लाभार्थी महिलेच्या आधार संलग्न बँक खात्यात किंवा पोस्ट ऑफिसमधील खात्यात तीन हप्त्यात थेट जमा केली जाते.

## प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजनेअंतर्गत अनुदान लाभ व त्यांचे वितरण:

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत (PMMVY) लाभ पात्र लाभार्थी महिलेस रुपये पाच हजार एवढी रक्कम आधार संलग्न बँक खात्यात (DTB) किंवा पोस्ट ऑफिसमधील खात्यात खालील तीन टप्प्यात जमा केली जाते.

### प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा पहिला हप्ता 1000

मासिक पाळीच्या शेवटच्या तारखेपासून 150 दिवसात गर्भधारणा नोंदणी केल्यानंतर प्राप्त होईल.

### प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा दुसरा हप्ता 2000

किमान एकदा प्रसवपूर्व तपासणी केल्यास गर्भधारणेचे सहा महिने पूर्ण झाल्यानंतर दुसरा हप्ता लाभार्थीच्या खात्यात जमा केला जाईल.

### प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा तिसरा हप्ता 2000

प्रसूती नंतर झालेल्या अपत्यांची जन्मनोंदणी व बालकास बीसीजी, ओपीव्ही, हिपॅटॅटीस आण लसीकरण पूर्ण झाल्यानंतर तिसरा हप्ता लाभार्थ्याच्या खात्यात जमा केला जाईल.

लाभार्थी महिलेची शासकीय रुग्णालयात प्रसुती झाल्यास त्यांना जननी सुरक्षा योजनेअंतर्गत ग्रामीण भागात रुपये 700 व रुपये 600 शहरी भागात लाभ अनुज्ञेय राहील.

## योजनेसाठी संपर्क:

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा PMMVY लाभ घेण्यासाठी लाभार्थींनी खालील प्रशासकीय स्तरांच्या आरोग्य केंद्रात संपर्क करता येतो.

### ग्रामीण क्षेत्र:

एएनएम (आरोग्य केंद्र सहाय्यक) पात्र लाभार्थींना विनाशूल्य विहित नमुना प्रपत्र 1 अ चा अर्ज देऊन अर्ज स्विकारतील व तो अर्ज प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत तालुका अधिकाऱ्यांकडे पाठवला जाईल. हा अर्ज भरण्याची जबाबदारी आरोग्य केंद्र सहाय्यकची असते. प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी अर्जातील माहिती तपासून तो अर्ज तालुका अधिकाऱ्यांकडे जमा करतील. विहित संकेतस्थळावर तालुका अधिकाऱ्यांमार्फत लाभार्थी महिलेच्या अर्जाची माहिती भरण्यात येईल. राज्यस्तरावरुन संगणक प्रणालीद्वारे थेट लाभ अदा करण्यात येईल.

### नगरपालिका क्षेत्र:

प्राथमिक आरोग्य केंद्र पात्र लाभार्थींना विनाशुल्क विहित नमुना प्रपत्र 1 अ चा अर्ज देऊन परिपूर्ण अर्ज स्विकारेल. परिपूर्ण अर्ज हेल्थ पोस्ट वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्याधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येईल. हेल्थ पोस्ट वैद्यकीय अधिकारी अर्जातील माहिती तपासून तो अर्ज मुख्याधिकाऱ्यांकडे सादर करतील. मुख्याधिकारी विहित संकेतस्थळावर लाभार्थी महिलेच्या अर्जाची माहिती भरतील.

### महानगरपालिका क्षेत्र:

मुंबई तसेच इतर महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य केंद्र सहाय्यक पात्र लाभार्थी महिलेला विनाशुल्क विहित नमुना प्रपत्र 1 अ चा अर्ज देऊन परिपूर्ण अर्ज स्वीकारतील. परिपूर्ण अर्ज वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येईल.

## मातृत्व वंदना योजना लाभासाठी आवश्यक कागदपत्रे:

• लाभाच्या पहिल्या टप्प्यासाठी आणि नोंदणीसाठी प्रपत्र 1 अ माता व बाल संरक्षण प्रमाणपत्र व आधार संलग्न बँक / पोस्ट खात्याची माहिती देणे आवश्यक आहे.

• लाभाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी प्रपत्र 1 ब माता व बाल संरक्षण प्रमाणपत्रावर किमान एक प्रसुतीपूर्व तपासणी (ए.एन.सी) ची नोंद असणे अनिवार्य आहे.

• लाभाच्या तिसऱ्या टप्प्यासाठी प्रपत्र 1 क जन्म नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व बाळाला लसीकरणाचा पहिला खुराक दिल्याची नोंद असलेले माता व बाल संरक्षण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

• लाभार्थी महिलेचे बँक खाते आधार संलग्न नसल्यास ते आधार संलग्न करण्यासाठी प्रपत्र 2 अ आणि पोस्ट खाते आधार संलग्न करण्यासाठी प्रपत्र 2 ब चा वापर करावा.

• आधारसंदर्भात नोंदणी / सुधारणा करण्यासाठी लाभार्थी प्रपत्र 2 क चा वापर करेल.

• या योजनेच्या नोंदणीबाबतच्या माहितीमध्ये (पत्ता/भ्रमणध्वनी क्रमांक/बँक खाते क्रमांक/ नावात बदल / आधार क्रमांक ) सुधारणा करण्यासाठी प्रपत्र 3 चा वापर करण्यात येतो.

• सदर प्रपत्रे अंगणवाडी सेविका / एएनएम तसेच आरोग्य संस्थेमध्ये विनाशुल्क प्राप्त होतील. तसेच लाभार्थींकडे आधार कार्ड / बँक खाते/ पोस्ट खाते नसल्यास सदर कार्ड व खाते काढण्यासाठी अंगणवाडी सेविका/एएनएम मदत करतील.

**जननी सुरक्षा योजना**

गर्भवती महिला आणि माता यांच्या आरोग्यदायी जीवनासाठी देशभरात अनेक योजना राबविल्या जात आहेत. देशातील ग्रामीण आणि शहरी भागात राहणाऱ्या दारिद्र रेषखालील कुटुंबामधील गर्भवती मातांना आर्थिक लाभ देण्यासाठी केंद्र शासनाने जननी सुरक्षा योजना १२ एप्रिल, २००५ रोजी सुरु केली.

जननी सुरक्षा योजनेअंतर्गत अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) दारिद्र्य रेषेखालील मातांना (BPL) मोफत प्रसूती सेवा आणि आर्थिक सहाय्य देण्यात येते.

## जननी सुरक्षा योजना पार्श्वभूमी:

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत जननी सुरक्षा योजना करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत दि. २६/१०/२००५ च्या शासन निर्णय क्र. जसुयो २००५/६७०/प्र.क्र.१७१/कु.क. नुसार सर्वप्रथम महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागात या योजनेच्या अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली. त्यानंतर, दि. १४/०८/२००६ च्या शासन निर्णयानुसार जननी सुरक्षा योजना महाराष्ट्रातील नागरी भागात नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यास मान्यता देण्यात आली.

## जननी सुरक्षा योजना उद्दिष्ट:

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील मातांना आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती महिलांचे आरोग्य संस्थेमध्ये होणारे प्रसुतीचे प्रमाण वाढवणे तसेच माता मृत्यु व अर्भक मृत्युचे प्रमाण कमी करणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. (Janani Suraksha Yojana Objectives).

## जननी सुरक्षा योजना लाभार्थी पात्रता:

१. दारिद्र्य रेषेखालील सर्व गर्भवती महिला/माता तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील सर्व गर्भवती महिला/माता (दारिद्र्य रेषेखाली नसलेल्या देखील) योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र असतील. (Janani Suraksha Yojana Eligibility).

२. लाभार्थी महिलेचे वय प्रसवपूर्व नोंदणी करताना कमीत कमी १९ वर्षे इतके असावे.

३. जननी सुरक्षा योजनेचा लाभ २ जिवंत अपत्यांपर्यंतच देय असतो.

## जननी सुरक्षा योजना मिळणारा लाभ:

• **ग्रामीण भागातील महिलांना मिळणारे लाभ:** ग्रामीण भागातील पात्र लाभार्थी जर शासकीय/निमशासकीय आरोग्य संस्थेत प्रसूती झाली असल्यास तिला प्रसुतीच्या तारखेनंतर ७ दिवसाच्या आतमध्ये रु. ७००/- इतकी रक्कम धनादेशाद्वारे दिली जाते.

• **शहरी भागातील महिलांना मिळणारे लाभ:** ग्रामीण भागातील पात्र लाभार्थी जर शासकीय/निमशासकीय आरोग्य संस्थेत प्रसूती झाली असल्यास तिला प्रसुतीच्या तारखेनंतर ७ दिवसाच्या आतमध्ये रु. ६००/- इतकी रक्कम धनादेशाद्वारे दिली जाते किंवा आधार संलग्न असेल्या बँक खात्यात थेट रक्कम जमा केली जाते. (Janani Suraksha Yojana Amount).

• शहरी तसेच ग्रामीण भागासाठी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील लाभार्थ्यांची प्रसुती घरी झाल्यास रु. ५००/- एवढी रक्कम लाभ प्रसुतीच्या तारखेनंतर ७ दिवसाच्या आत देण्यात येते. (Janani Suraksha Yojana Benefits In Marathi).

• सिझेरीयन शस्त्रक्रिया (Cesarean Delivery) झाल्यास पात्र लाभार्थीस रु. १५००/- इतकी रक्कम देण्यात येते.

## जननी सुरक्षा योजना व आरोग्य सेविका (आशा वर्कर):

जननी सुरक्षा योजनेमध्ये (JSY In Marathi) आशा वर्करचा महत्वाचा सहभाग असतो. गर्भवती महिलेचे आरोग्य संस्थेत नाव नोंदणी करून घेण्यापासून ते पात्र लाभार्थीचा लाभ मिळवून देण्यापर्यंत विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडीत असतात.

• गर्भवती महिलांची नाव नोंदणी करून घेणे.

• नाव नोंदणी केल्यानंतर लाभार्थीस जननी सुरक्षा कार्ड मिळवून देणे.

• विहित नमुन्यातील अर्ज भरून घेणे.

• पात्र लाभार्थींकडून आवश्यक कागदपत्रे जमा करुन घेणे.

• प्रसूतीपूर्वीच्या तपासण्या करून घेणे.

• लसीकरण आणि लोहयुक्त गोळया मिळवून देणे अथवा त्याकरिता मदत करणे.

• शासकीय आरोग्य संस्थेत प्रसुतीकरिता प्रवृत्त करणे.

• लाभार्थींकडे बँक खाते नसल्यास, त्यांना बॅंकेत खाते उघडून घेण्यासाठी मदत करणे.

जननी सुरक्षा योजनेअंतर्गत ग्रामीण भागात पात्र लाभार्थ्यांना आरोग्य संस्थेत प्रसुतीसाठी प्रवृत्त केल्याबद्दल आशा कार्यकार्यकर्तीनां रु. ६००/- प्रती लाभार्थी मानधन देण्यात येते. त्यामधील रु. ३००/- गर्भवती महिलेच्या प्रसूतीपूर्व आणि रु. ३००/- आरोग्य संस्थेत प्रसुतीसाठी प्रवृत्त केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर देण्यात येते.

शहरी भागात पात्र लाभार्थीची प्रसुती आरोग्य संस्थेत करण्यासाठी लाभार्थीस प्रवृत्त केल्यास एकूण रु. ४००/- प्रती लाभार्थी आशा कार्यकर्तीस मानधन म्हणून देण्यात येते. त्यामधील रु. २००/- प्रसूतीपूर्व आणि रु. २००/- आरोग्य संस्थेत प्रसुतीसाठी प्रवृत्त केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर देण्यात येते.

राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शासकीय ग्रामीण व शहरी रुग्णालये, शासनमान्य खाजगी रुग्णालये या ठिकाणी जननी सुरक्षा योजनेचा लाभ मिळवता येतो.

## जननी सुरक्षा योजना आवश्यक कागदपत्रे:

१. रहिवाशी दाखला

२. शाळेचे प्रमाणपत्र

३. जात प्रमाणपत्र

४. आधार कार्ड प्रत

५. बँक पासबुक झेरॉक्स

६. जननी सुरक्षा कार्ड

७. फोटो

योजनेचा लाभ मिळविण्यासाठी जवळच्या शासकीय रुग्णालयात किंवा अंगणवाडी केंद्रात भेट देऊन, नाव नोंदणी करण्यासाठीचा अर्ज प्राप्त करू शकता.